News Paper Name: Prabhat (Pune Edition)
Language: Marathi
Web Link: http://epaper.eprabhat.net/1149497/Pune-City-Edition/City#page/13/1
Page Number : 3
Date: 27 March 2017

पुणे www.eprabhat.net गुड मॉर्निंग
प्रभात पुणे, सोमवार, दि. २७ मार्च २०१७ 03

# दहशतवादाविरुद्ध भारताने अधिक सक्षम होण्याची गरज

**सोशल सायन्स रिसर्च संस्थेचे संचालक उपेंद्र चौधरी यांचे मत**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात रंगली आंतरराष्ट्रीय परिषद**

पुणे, दि. २६ (प्रतिनिधी)- भारताने दहशतवादाचा सामना करण्यासाठी स्वत:ला अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे, असे मत दिल्ली येथील इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च संस्थेचे संचालक उपेंद्र चौधरी यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण नॅशनल सेंटर ऑफ इंटरनॅशनल सिक्युरिटी अ‍ॅण्ड डिफेन्स अ‍ॅनालिसिस (वायसी- निसदा), बाबासाहेब आंबेडकर स्टडीज सेंटर व अध्यासन, संरक्षण व सामरिकशास्त्र विभागातर्फे आयोजित 'दहशतवाद व प्रतिदहशतवाद' या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी चौधरी बोलत होते.

कार्यक्रमास विद्यापीठचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, अमेरिकेच्या पेनिसिल्व्हिसा स्टेट युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ इंटरनॅशनल अफेअर्सचे प्रा. स्टॉक सिग्मंड गार्टनर, एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले, सामरिक विश्लेषक श्रीनिवास सोहनी, निसदाचे संचालक व विभाग प्रमुख डॉ. विजय खरे, संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. अरुण दळवी उपस्थित होते.

चौधरी म्हणाले, सध्या पाकिस्तान आणि चीनचे मैत्रिपूर्ण संबंध आणि अमेरिकेचा असणारा पाठिंबा या कारणाने पाकिस्तानला राजनैतिक दृष्ट्या एकटे पाडण्यासाठी केल्या जाणाऱ्या भारताच्या प्रयत्नांना फारसे यश येणार नसल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. वासुदेव गाडे म्हणाले, दहशतवाद हा सामूहिक मुद्दा राहिलेला नसून तो एक आंतरराष्ट्रीय समस्या बनला आहे. दहशतवादाची कारणमिमांसा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय दहशतवादाला रोखता येणार नाही.

परिषदेत श्रीकांत सोहनी, श्रीकांत परांजपे, गोपाल मालविया, राकेश दत्ता, निवृत्त लेफ्टनंट जनरल डी. बी. शेकटकर, त्रिदीप चक्रवर्ती आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. विजय खरे यांनी केले.